॥ गगनिं उगवला सयंतारा ॥

गायकः गजानन वाटवे
गीतः अनिल
संगीतः गजानन वाटवे

गगनिं उगवला सयंतारा
मंद सुशीतल वाहत वारा
हांक तुझी मज स्पष्ट ऐकुं ये
येइ सखे, ये बैस जवळिं, ये
घाल गळां मम तव कर कोमल
पसरूं दे श्वासाचा परिमल
घेई मम हृदयांत निवारा
गगनिं उगवला सयंतारा ॥ १ ॥

बैस जवळिं ये, बघ ती पश्चिम
कोमल रंगीं फुलली अनुपम
ये नेत्रीं तें घेउं साठवुनि
गालावरती गाल ठेवुनी
उदासीनता विसर जगाची
तुझाच मी, तूं माझि सदाची
विरलें हृदयांतरिं, बघ अंतर
तूं अणिक मी जवळ निरंतर
सरे एकसरि भेद पसारा
गगनिं उगवला सयंतारा ॥ २ ॥